**श्री.अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/३६/२०२३

दिनांक - ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. श्रीमती.सायाबी अमिन शेख

२. सलिमा दस्तगिर मुल्ला

३. आरिफा सलीम मुल्ला

४. नसिमा बशिर कुरणे

५. अंजूम यासीन मकानदार

अ.क्र.१ रा. सालेकीरी, ता.जत, जि.सांगली

अ.क्र.२ व ३ रा.पाच्छापूर ता.जत जि.सांगली

अ.क्र.४ रा.कुरणे गल्ली, मिरज ता.मिरज जि.सांगली

अ.क्र.५ रा.खाटीक गल्ली, जत ता.जत जि.सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. श्रीमती.खातून बाबालाल शेख

स्वतास म्हणवणारी श्रीमती खातून दादासो शेख

२. शाहिदा जावीद मुजावर

अ.क्र.१ रा.निगडी खुर्द, ता.जत, जि. सांगली

अ.क्र.२ रा. शेगांव ता.जत जि.सांगली ..... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**वाद मिळकतीचा तपशिल**

| गांव | तालुका | गट नंबर | एकूण क्षेत्र | पैकी वादाचे क्षेत्र | वादाचा फेरफार |
|---|---|---|---|---|---|
| शेडयाळ | जत | ४१७ | २० हे. ८० आर. | ०३ हे १२ आर | २३०९ |

**निकालपत्र**

मंडळ अधिकारी, वळसंग, यांनी मौजे. शेडयाळ, ता. जत, जि. सांगली येथील वारस फेरफार नंबर २३०९, प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपीलकामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जात सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत ही कै. बाबालाल अमिन शेख यांना यांचे वाडवडीलार्जीत व कुळ कायदयाने वारसाने आलेली मिळकत आहे. ते दि. २३/१२/२०२० रोजी मयत झाले आहे. त्यांची खरी व कायदेशिर पत्नी कै. रोशनबी बाबालाल शेख ही होती. ती मयत झाली आहे. कै.रोशनबी बाबालाल शेख हिस अपिलार्थी नं २ ते ५ या मुली जन्मले आहेत. अपिलार्थी नं. १ या कै.बाबालाल अमिन शेख यांच्या जनक आई आहेत.

२. कै.बाबालाल अमिन शेख यांना अपिलार्थी नं. १ या जनक आई म्हणून तसेच कै.बाबालाल अमिन शेख यांना कै.रोशनबी बाबालाल शेख यांच्या पोटी जन्मलेल्या मुली म्हणजे अपिलार्थी नं २ ते ५ या मुलीच खरे व कायदेशिर वारस आहोत. त्यामुळे कै.बाबालाल अमिन शेख याचे पश्चात त्याचे वारस म्हणून अपिलार्थी नं १ जनक आई व अपिलार्थी नं. २ ते ५ या चार मुलींचे वारसा लागणे मुस्लिम कायदयाप्रमाणे आवश्यक आहे. सदर जाबदार नं १ हि कायमपणे निगडी येथील रहिवाशी असून तिचे

नांव श्रीमती खातुन दादासो शेख आहे. तिने दि.०५/०१/२०२३ रोजी खोटी व बनावट रचना करून मयत कै.बाबालाल अमिन शेख यांचा वारसा लावणेकामी अपिलार्थीचे अपरोक्ष अर्ज केला.

३. खालील कोर्टाने सदसद न्यायविवेकबुध्दीचा वापर न करता एल.एल.आर.सी कायदयाप्रमाणे सहहिस्सेदाराना नोटीस न करता : मुस्लिम कायदयाप्रमाणे आई ही वारस होते सदर जाबदार यांनी जे म्हणणे दाखल केलेले आहे त्यामध्ये असे म्हणणे दिसते की, मयत बाबालाल यांची सायाबी ही सावत्र आई होती. तथापि, मूळ जमिन ही हुसेन यांची होती त्याच्या मयताच्या पश्चात बाबालाल सोबत आप्पालाल, मिरासाब व इतर मुलांच्या सोबत सायाबी म्हणजे अपिलार्थी नं १ ही देखील वारस होते. त्यामुळे तिचाही हक्क पोहचतो म्हणून तिने त्यांच्या नातीसोबत तक्रारी अर्ज दिला होता. तिला म्हणणे मांडण्याची संधी न देता फे. नं. २३०९ ची नोंद मंजूर केलेली आहे ती चुकीची आहे.

४. जाबदार यांनी हजर होऊन जो लेखी युक्तीवाद हजर केलेला आहे तो चुकीचा व बेकायदेशिर असेलेने अपिलार्थी यांना मान्य व कबुल नाही. ग.नं. ४१७ चे व्यवस्थापन जे नमूद केलेले आहे. ती बाब पाहता ते कशा अन्वये केले व त्या व्यवस्थापन करताना मयत हुसेन यांनी दोन्ही पत्नींच्याबाबत त्यांच्या भविष्याकरीता व्यवस्थापनात काय लिहीले आह हे नमूद नाही. तसेच व्यवस्थापन पत्रही रेकॉर्डवर नाही ही बाब पाहता जाबदार यांचे म्हणणे चुकीचे आहे.

५. जाबदार यांनी दिले लेखी युक्तीवादातील पॅरा नं ५ मधील मजकूर चुकीचा असून अपेलंट नं.१ ही मयत हुसेन यांची पत्नी असलेने तिला व्यवस्थापनासाठी काय केले आहे हे नमूद नाही. त्यामुळे ती जरी मयत बाबालची जनक आई नसली तरी मयत पती हुसेन यांच्या पश्चात तिला हक्क व हिस्सा येतो. जाबदार यांच्या लेखी युक्तीवादातील पॅरा ६ पाहता ते दोन्ही ही मे. वरीष्ठ महसूली न्यायालयात व मे. दिवाणी न्यायालयात हिब्बानामाबाबत वाद प्रलंबित आहे सदर नमूद हिब्बानामा वा त्याबाबतचे वाद याबाबत अपिलार्थी यांना अलीकडेच माहिती मिळालेली आहे. त्यामुळे जे मे. दिवाणी कोर्टाचा आदेश होईल त्याप्रमाणे घडामोडी होणार आहेत.

**जाबदार यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामधील सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. अपिलार्थी व जाबदार घराणेचा मुळ पुरुष हुसेन, हुसेन याना अमिन हा एकच मुलगा अमिन याची दोन लग्ने झाली होती प्रथम पत्नी हलाबी, हीस अमिन पासुन बाबालाल एकच मुलगा झाला. त्यानंतर अमिन यानी सयाबी (अपिलार्थी नं. १) बरोबर दुसरा विवाह केला. सयाबी हिस अमिन पासुन अनुक्रमे १ आप्पालाल २ मिरासाब हि मुले झाली व ३ माशामाँ ४ मुमताज ५ सबजाबी ६ खतिमाँ या चार मुली झाल्या. अपिलार्थी नं.१ चा मुलगा मिरासाब याचा मुलगा हुसेन आहे. म्हणजे अपिलार्थी नं.१ चा नातु आहे. बाबालाल याची ही दोन लग्ने झाली. प्रथम पत्नी खातुन (जाबदार नं. १) खातुन हिस बाबालाल पासुन शहिदा ( जाबदार नं.२) ही मुलगी झालेली आहे. खातुन ही पत्नी असताना, बाबालाल यानी रोशन (मयत) बरोबर दुसरा विवाह केला. सदर विवाह संबंधातुन रोशन हिस बाबालाल पासुन अनुक्रमे १ सलिमा २ अरिफा ३ नसिमा ४ अंजुम या मुली झालेल्या आहेत. त्या सर्व मुली या कामी अपिलार्थी नं. २ ते ५ आहेत. येणे प्रमाणे अपिलार्थी व जाबदार याचे घराणेची वंशावळ आहे.

२. मुळ पुरुष हुसेन यानी त्यांचे हैयातीत त्यांचा मुलगा अमिन यानी दोन लग्ने केलेने, पुढे त्यांचे बायका मध्ये वा नातवा मध्ये वाद विवाद होऊ नयेत म्हणुन सदर जमीनीचे व्यवस्था खालील प्रमाणे केली. अमिनची पहिली पत्नी हालाबी हिचा मुलगा बाबालाल यांचे नावे ग.नं.४१७ पैकी ६ हे ९७ आर

क्षेत्र केले. अमिनची दुसरी पत्नी सयाबी (अपेलेंट नं.१) हिचा मुलगा आप्पालाल यांचे नावे ग.नं. ४१७ पैकी ६ हे ९७ आर क्षेत्र केले. अमिनची दुसरी पत्नी सयाबी (अपेलेंट नं.१) हिचा दुसरा मुलगा मिरासाहेब यांचे नावे ग.नं. ४१७ पैकी ६ हे ९७ आर क्षेत्र केले. या प्रमाणे हुसेन यानी तिन्ही नातवाचे नावे समान क्षेत्र केले. परंतु मुलगा अमिन यांना कांही एक क्षेत्र दिलेले नाही. पुढे बाबालाल, आप्पासाहेब व मिरासाहेब यांनी ज्यांची त्यांचे सोयी प्रमाणे त्यांचे, त्यांचे क्षेत्राची विक्री, व व्यवस्थापत्र केलेले आहे. पैकी आप्पासाहेब यानी त्यांचे हिस्सेचे संपुर्ण क्षेत्र विक्री केलेले आहे.

३. अपिलार्थी नं.१ हिचा बाबालाल यांचे क्षेत्राशी कोणताही सुतराम संबंध नाही. वास्तविक सदर जमीन बाबालाल यांचे कडे त्यांचे आजोबा हुसेन कडुन आलेली आहे. बाबालाल यांचे कडे यांचे आजोबा हुसेन कडुन आलेली आहे. बाबालाल हा अपिलार्थी नं.१ चा जनक मुलगा नाही. त्यामुळे बाबालाल यांचे मिळकतीशी अपिलार्थी नं. १ हिचा सुतराम संबंध नाही.

४. अपिलार्थी नं. १ चा नातु म्हणजे अपिलार्थी नं. १ चा मुलगा मिरासाब याचा मुलगा हुसेन यानी बाबालाल आजारी असताना व सांगली येथील हॉस्पीटल मध्ये ॲडमिट असताना त्यांचे असहयतेचा गैर फायदा घेऊन बाबालालचे नावे असणारे क्षेत्राचा बेकायदेशीर, बनावट, व रद्दबातल असा हिब्बानामा केलेचा पार्श केला व त्यातथाकथीत दस्ता आधारे बाबालाल याचे क्षेत्रास नाव दाखल करणेचा खटाटोप केला. परंतु त्या कामी त्यास यश आले नाही. म्हणुन त्यावर याच मे. कोर्टात क्र.आर.टी.एस.अपिल नं.९२/२०२१ दाखल केले. त्या कामी ही त्यास यश आले नाही. म्हणुन त्यावर सांगली येथील मे. अप्पर जिल्हाधिकारी सो यांचे कडे क्र.आर.टी.एस/दुसरे अपिल नं.५०३/२०२२ दाखल केले त्या कामी यश येणार नाही. म्हणुन तेवढेवर तो न थांबता त्यांनी जत येथील मे. दिवाणी न्यायालय जत यांचे कोर्टात रे.दि.म.नं.१९७/२०२३ चा दावा ही दाखल केलेला आहे. सदर प्रकरणा मध्ये अपिलार्थी नं.१ यानी कोठेही तक्रार हरकत केलेली नाही. वा त्यामध्ये स्वतःला पक्षकार करावे म्हणुन ही विनंती अर्ज केलेला नाही. म्हणजे केवळ नातवाला जमीन मिळवुन देणे करीता प्रस्तुतच्या खोट्या अपिलांची रचना केलेली आहे हे स्पष्ट होत आहे.

५. अपिलार्थी यांचे पुर्ण अपिल मेमो पाहाता अपिलार्थी यंनी प्रस्तुत अपिल हिंदु वारसा कायद्याचे तत्वांवर आधारीत दाखल केलेले आहे. वास्तविक सदर अपिलच मुळात चालणेस पात्र नाही.

६. वास्तविक जाबदार नं. १ हिने बाबालालचे हैयातीनंतर बाबालाल शाखेचे सर्व वारसदार म्हणजे अपिलार्थी नंबर २ ते ५ व जाबदार नं. १ व २ यांचा रितसर वारसा दाखल होणे करीता अर्ज दिला. त्यांची स्थानीक चौकशी अंती सदर वारसा अर्ज मंजुर होऊन ७/१२ अभिलेख सदरी फेरफार नं.२३०९ ने नोंद झाली ती पुर्ण पणे योग्य कायदेशीर व न्यायीक तत्वांला अनुसरुन केलेली आहे. त्यामध्ये कोणतेही प्रकारचा फेरबदल करणेची आवश्यकता नाही. मुस्लिम कायद्या मध्ये तिनच वर्गामध्ये वारसांची वर्गवारी केलेली आहे. ती म्हणजे 1) Sharers 2) Residuaries 3) Distant Kindred जर वर्ग १ मधिल वारसदार नसतील तरच मयताची मिळकत वर्ग २ मधिल वारसाकडे जाते. वर्ग २ मधिल वासदार नसतील तरच वर्ग ३ मधिल वारसाकडे हक्क जातात. अपिलार्थी नं. २ ते ५ व जाबदार नं. १ व २ हे वर्ग १ मधिल वारसदार आहेत.

७. पंचनामा हा विशिष्ट जाती-जमीतीचे लोकानांच घेऊन केला पाहिजे असा कोणत्याही धर्माचे कायद्यात बंधन कारक दंडक नाही. जी व्यक्ती सुज्ञ, सज्ञान आहे. तिला वास्तवाची पुर्ण कल्पना व

माहिती आहे. असी कोणताही व्यक्ती पंच म्हणुन चालु शकते. मुस्लीम कायद्यात त्यांचेच जाती धर्माचा पंच असावा असे कोठे ही नमुद नाही. त्या अनुशंगाने अपेलेंट यांनी केलेले कथन बालीश व पोरकर पणाचे आहे हे योग्य नाही.

८. वास्तविक अपिलार्थी नं. २ ते ५ यांची दिशाभुल करुन, त्यांचे अज्ञान व आडाणी पणाचा अपिलार्थी नं.१ गैर फायदा घेऊन, अपिलार्थी नं.१ चा नातु श्री. हुसेन यांचे बदसल्याला बळी पडुन प्रस्तुचे बनावट, कपोलकल्पीत, रचनात्मक नसलेने अपिलार्थी यांचे अपिल प्रथमदर्शनी फेटाळणेत यावे.

**अपिलार्थी यांनी प्रकरणी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणी उपलब्ध कागदपत्र यांचे एकत्रित अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मंडळ अधिकारी, वळसंग, यांनी मौजे. शेडयाळ, ता. जत, जि. सांगली येथील वारस फेरफार नंबर २३०९, प्रकरणी दिलेल्या निर्णयावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

२. प्रकरणातील पुराव्याचे कागदपत्राचे अवलोकन करता कै.बाबालाल अमिन शेख हे दिनांक २३.१२.२०२० रोजी मयत झाले असून त्यांचे मृत्यूनंतर जाबदार व अपिलार्थी २ ते ५ यांची वारस नोंद झालेचे दिसून येते. वास्तविक वादातीत वारसा फेरफार मंजूर करीत असतांना " अन्य कायदेशीर वारस निर्माण झालेस हक्क ठेवून नोंद मंजूर नोंद प्रमाणीत " असा शेरा नमूद करून वादातीत वारसा फेरफार मंजूर केलेला आहे. यावरून मंडळ अधिकारी वळसंग यांनी मयतांचे वारसांची सखोल चौकशी न करता वारसा नोंद मंजूर केलेली आहे हे सिध्द होत आहे. सदर मंडळ अधिकारी वळसंग यांची वारसा नोंद मंजूर करणेची कृती कायदेसुसंगत ठरत नाही.

३. जाबदार यांनी सादर केले वंशावळ पाहता बाबालाल यांना खातुन व रोशन या दोन पत्नी होत्या पैकी कायदेशीर पत्नी कोणती याबाबत कोणताही कायदेशीर पुरावा माझे निदर्शनास आणलेला नाही. वाद मिळकती सदरी झालेली वारसा नोंद शरियत कायदा (मुस्लिम वैयक्तीक कायदा ) १९३७ मधील तरतूदीनुसार झालेली नाही. त्यामुळे झालेली वारस नोंद कायदेशीर नाही. यास्तव अपिलार्थीचे अपील अर्ज स्विकृत करून वारसा फेरफार नंबर २३०९ रद्द करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. **अपिलार्थी व जाबदार यांनी दिवाणी न्यायालयातून वारसा निश्चिती केल्यावर वारसा नोंद तलाठी जत यांनी करावी.** सबब मी, अजयकुमार, उपविभागीय अधिकारी जत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येते व मौजे जत ता.जत जि.सांगली येथील वारसा फेरफार क्रमांक २६५३४ रद्द करण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणतेही आदेश नाहीत.

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील मुदतीनंतर करण्यात यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधितांना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.in या वेबसाईटवर पाहणेस उपलब्ध आहे.

ठिकाण - जत

दिनांक -३१.०१.२०२५

(अजयकुमार नष्टे)

**उपविभागीय अधिकारी**

**जत उपविभाग जत**

प्रत- तहसिलदार,जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.